स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२२–२३/९४७ दि. १५/०२/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३९३ वा जन्मोत्सव–हिंदवी स्वराज्य महोत्सव, २०२३ महाशिव आरती कार्यक्रमाकरिता दि. १९.०२.२०२३ रोजी किल्ले शिवनेरी येथे विविध महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक उपस्थित राहण्याबाबत

संदर्भ : मा.उपसंचालक, पर्यटन संचालनालय, नाशिक यांचे पत्र प.क्र.पर्यटन संचालनालय/उपसं/नाशिक/आस्थापना/२०२३/६५,दि.१३/०२/२०२३

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भ पत्रानुसार पर्यटन संचालनालय व स्थानिक जिल्हा प्रशासन, पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने दि. १८ ते २१ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत किल्ले शिवनेरी, ता. जुन्नर, जि. पुणे येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९३ वा जन्मोत्सव–हिंदवी स्वराज्य महोत्सव, २०२३ चे आयोजन करण्यात आले आहे. सदर महोत्सवा दरम्यान दि. १९ फेब्रुवारी, २०२३ रोजी सायं. ०६.०० वाजता हजारो लोकांच्या साक्षीने “महाशिव आरती” कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे प्रस्तावीत आहे. सदर कार्यक्रमाकरिता आपल्या महाविद्यालयातील इच्छुक विद्यार्थ्यांना(मुले) स्वयंसेवक म्हणून किल्ले शिवनेरी येथे पाठविण्यात यावे.

तसेच सदर विद्यार्थ्यांबरोबर महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांना देखील कार्यक्रमाकरिता उपस्थित राहण्यास सूचित करावे. सदर स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांचा प्रवास व खानपानाची व्यवस्था ही उपसंचालक, विभागीय पर्यटन संचालनालयाद्वारे करण्यात येणार आहे. सदर विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी यांनी किल्ले शिवनेरी येथे दि. १९.०२.२०२३ रोजी दुपारी ०१.०० वाजता कार्यक्रम स्थळी कार्यक्रमाची रूपरेषा तसेच आवश्यक ते मार्गदर्शन प्राप्त करण्यासाठी उपस्थित राहण्याचे सूचित करण्यात यावे. तसेच सदर कार्यक्रमाकरिता जे विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी यांच्या नावाची यादी सपंर्क क्रमांकासह nss_student_list@pun.unipune.acin या मेलवर NSS Code “जन्मोत्सव–हिंदवी स्वराज्य महोत्सव” या विषयासह पाठवावी. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :
१.डॉ. अशोक घोरपडे, रासेयो जिल्हा समन्वयक, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर. सपंर्क नं–९४२१३३४३८३
२.डॉ. रविंद्र आहिरे, रासेयो जिल्हा समन्वयक, कर्मवीर शांताराम कोंडाजी वावरे महाविद्यालय,सिडको, नाशिक, सपंर्क नं–९७६५२१९४२२